# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.01.2026** **वार- रविवार**

---

**पुणे ग्रॅण्डटूर**

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या 'बजाज पुणे ग्रँड टूर' या सायकल स्पर्धेचा थरार उद्यापासून पुणे जिल्ह्यात रंगणार आहे. जगभरातल्या 35 देशांतले 29 संघांचे 171 आघाडीचे सायकलपटू यात भाग घेणार आहेत. पुणे जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारनं; सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचं आयोजन केलं आहे.
स्पर्धेचा पहिला टप्पा उद्या दुपारी पुण्यातील गुडलक चौकातून सुरू होईल आणि डेक्कन जिमखाना बस स्थानकावर या टप्प्याचा समारोप होणार आहे. 437 किलोमीटरच्या या सायकल शर्यतीसाठी अद्ययावत रस्ते, सुरक्षा यंत्रणा, आणि सर्व आवश्यक सुविधा पूर्ण करण्यात आल्या आहेत. या शर्यतीचा मार्ग दख्खनचं पठार आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून जातो. पुण्याच्या 9 तालुक्यांमधून आणि 150 गावांतून सायकलपटू मार्गक्रमण करणार आहेत, या स्पर्धेच्या माध्यमातून पुण्याचा सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्थळे आणि ग्रामीण पर्यटनाचे दर्शन घडवलं जाणार आहे. स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात उत्साहाचं वातावरण आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या देश परदेशातील सायकलपटूच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट करण्यात आली आहे.
सासवड – बारामती मार्गावर पुण्यातील प्रसिद्ध क्रीडा संघटक, सायकलप्रेमी अनिरुद्ध देशपांडे यांनी स्पर्धकांच्या स्वागतासाठी 6 मीटर उंच आणि 12 मीटर रुंद सायकलची भव्य प्रतिकृती उभारली आहे. बोपदेव घाटातली सायकलची ही भव्य प्रतिकृती रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांचं लक्ष वेधून घेत आहे.

**वाहतूक बदल**

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता, शहराच्या मध्यभागातले रस्ते आणि त्यांना जोडणारे उपरस्ते उद्या सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत बंद राहणार आहेत. त्यामुळे उद्या या मार्गावरच्या शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. स्पर्धा मार्गावरच्या खासगी कार्यालयातल्या कर्मचाऱ्यानी आणि व्यावसायिकांनीही शक्यतो मेट्रो सेवेचा वापर करावा असं आवाहन पुणे पोलिसांनी केलं आहे.

**महाराष्ट्राचा चित्ररथ**

77व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी राजधानी नवी दिल्लीत होणाऱ्या संचलनात यंदा महाराष्ट्राचा चित्ररथही सहभागी होणार आहे. 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचं प्रतीक' ही राज्याच्या चित्ररथाची संकल्पना आहे. यातून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचं दर्शन घडवलं जाणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजं पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचं प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ओळख असलेल्या ढोल-ताशा पथकाच्या सादरीकरणातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेशही दिला जाईल.

**जिल्हा परिषद**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूका दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एकत्रित लढणार असल्याचं राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सांगितलं. ते आज बारामती इथं पत्रकारांशी बोलत होते. महापालिका निवडणुकीतील पराभवाने आम्ही खचून जाणार नाही. मतदारांनी दिलेला कौल आम्ही स्वीकारला आहे, असंही शशिकांत शिंदे म्हणाले.

**Pmpml**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात पीएमपीएमएलने केंद्र सरकारकडे पीएम-ई ड्राइव्ह योजनेंतर्गत एक हजार ई-बसची मागणी केली आहे. या सुविधेसाठी संबंधित कंपन्यांना दरमहा द्यावी लागणारी खर्चाची रक्कम पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून थेट संबंधित कंपन्यांना वळती करण्यासाठी काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. बहुतांश पालेभाज्या आणि फळभाज्यांचे दर स्थिर आहेत. हवेतला गारठा काहीसा कमी झाल्याने पेरू, मोसंबी आणि बोरांना मागणी वाढली असून भावही वाढले आहेत. संत्र्यांचीही चांगली आवक झाली असून दर घटले आहेत. फुल बाजारात भाव स्थिर आहेत.

**अपघात**

पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत काल रात्री झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला; तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. मोटरीच्या चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळल्याने हा अपघात घडला. मोटरीतील प्रवासी पनवेलहून अक्कलकोटकडे निघाले होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 13 पूर्णांक 7 दशांश अंश; तर कमाल तापमान 31 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित वाढ होईल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**